अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 02 जुलै 2026 | वर्ष 11 वे | अंक 47 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## ब्रम्हपुरी जिल्हा निर्मितीसाठी संघर्ष समिती आक्रमक

### विधीमंडळात आवाज उठविण्याचे आमदार विजय वडेट्टीवारांचे ठोस आश्वासन



ब्रह्मपुरी/का.प्र.

'ब्रह्मपुरी स्वतंत्र जिल्हा' व्हावा किंवा तात्काळ स्वरूपात येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयासह सर्व जिल्हास्तरीय उप-कार्यालये मंजूर व्हावीत, या मागणीसाठी 'ब्रह्मपुरी जिल्हा निर्माण संघर्ष समिती'च्या वतीने २७ जून २०२६ रोजी राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा ब्रह्मपुरी विधानसभेचे लोकप्रिय आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांची त्यांच्या ब्रह्मपुरी येथील निवासस्थानी प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली व मागण्यांचे निवेदन सोपविण्यात आले.

या भेटीदरम्यान आमदार महोदयांसोबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाली असून त्यांनी चालू पावसाळी अधिवेशनात महसूल विभागाच्या चर्चेदरम्यान ब्रह्मपुरी जिल्हा निर्मितीचा प्रश्न लावून धरण्याचे ठोस आश्वासन दिले आहे. ब्रह्मपुरी परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी जे जे प्रयत्न करता येतील, ते सर्व करण्याचे त्यांनी जाहीर केले. तसेच जिल्हा निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा ब्रह्मपुरीत आधीच उभारण्यात येत असून, उर्वरित आवश्यक सुविधाही लवकरच पूर्ण केल्या जातील, असे आमदार महोदयांनी सांगितले. चर्चेमध्ये प्रा. देविदासजी जगनाडे व विनोद झोडगे यांनी प्रामुख्याने सहभाग घेतला.

चंद्रपूर जिल्ह्याचा वाढता भौगोलिक विस्तार आणि लोकसंख्या पाहता, प्रशासकीय सुलभतेसाठी जिल्ह्याचे विभाजन करणे अनिवार्य झाले आहे. ब्रह्मपुरीत आधीच उपविभागीय अधिकारी (महसूल) कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आणि उपजिल्हा रुग्णालय यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे जोपर्यंत पूर्णवेळ जिल्हा निर्मिती होत नाही, तोपर्यंत अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय, अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, प्रादेशिक परिवहन

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## ब्रम्हपुरी बाजार समितीचे प्रांगण बनले गंदगीचे साम्राज्य

### लाखोंचा महसूल मात्र नियोजनाचा बोजवारा; व्यवस्थापन मंडळाचे दुर्लक्ष; शेतकरी भवन अर्धवट

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहराच्या मोक्याच्या आणि अत्यंत महत्त्वाच्या जागेवर विस्तीर्ण मैदानामध्ये विस्तारलेल्या ब्रम्हपुरी येथील 'कृषी उत्पन्न बाजार समिती'चे आवार सध्या विदारक स्थितीला तोंड देत आहे. विविध बाजारांच्या माध्यमातून समितीला दरमहा लाखो रुपयांचा महसूल मिळत असतानाही, केवळ 'व्हिजन' आणि योग्य नियोजनाअभावी या संपूर्ण परिसराला 'गंदगीच्या साम्राज्या'चे स्वरूप आले आहे. व्यवस्थापन मंडळाच्या या अनास्थेमुळे नागरिक, व्यापारी आणि शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

गेल्या २५-३० वर्षांत ब्रम्हपुरीची लोकसंख्या झपाट्याने वाढली. पूर्वी बाजार चौकात भरणारा जनावरांचा बाजार, आठवडी बाजार, भाजी बाजार आणि मटण-मच्छी मार्केट वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भव्य आवारात स्थलांतरित करण्यात आले. आजघडीला या आवारात दररोज लागणारे होलसेल व चिल्लर भाजीपाला मार्केट, दैनिक मटण, चिकन आणि मच्छी मार्केट, मंगळवार आणि शुक्रवारचा अधिकृत आठवडी बाजार, शुक्रवारचा शेळी-बकऱ्यांचा बाजार आणि रविवारचा मोठा जनावरांचा बाजार व शेकडो हॉटेल्स, दुकाने व व्यावसायिक गाळे सुरू आहेत. या सर्व माध्यमांतून बाजार समितीला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळत आहे. मात्र, या उत्पन्नाचा वापर आवाराच्या विकासासाठी आणि स्वच्छतेसाठी का केला जात नाही? असा रोकडा सवाल आता नागरिक विचारत आहेत.

बाजार समितीच्या परिसरात नेवाजबाई हितकरिणी महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, एसटी डेपो, बस स्टँड आणि शहराची मुख्य पाणीपुरवठा योजना आहे. अशा गजबजलेल्या भागात असूनही येथील स्थिती अत्यंत दयनीय आहे. आवारातील नाल्या पूर्णपणे फुटलेल्या आहेत. नवीन नालीसाठी केवळ खड्डे खोदून ठेवण्यात आले असून काम अपूर्ण आहे. मुत्रीघरातील पाणी आणि नळाचे पाणी सतत रस्त्यावर वाहत असते. पावसाळ्यात तर संपूर्ण परिसराला तळ्याचे स्वरूप येते. भाजीपाल्याचा सडलेला कचरा आणि शेणाचे ढीग जागोजागी कुजत पडलेले असतात. त्यातच मटण-मच्छी मार्केटमध्ये नियमित स्वच्छता होत नसल्याने परिसरात प्रचंड कुबट वास पसरला असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दररोज हजारो लोकांची ये-जा असतानाही येथे वाहने उभी करण्यासाठी कसलेही नियोजन नाही. ओटे ठिकठिकाणी खचले आहेत.

या बाजार समितीत विक्रीसाठी येणारा सर्व शेतीमाल, भाजीपाला आणि जनावरे ग्रामीण भागातील गरीब शेतकऱ्यांकडून येतात. परंतु, दुर्दैवाने गेल्या २५-३० वर्षांत ही समिती शेतकऱ्यांची वाटतच नाही. रस्त्याला लागून व्यापारी गाळ्यांचे बांधकाम जोरात सुरू आहे, मात्र शेतकऱ्यांसाठी हक्काचे असणारे 'शेतकरी भवन' गेल्या अनेक वर्षांपासून अर्धवट स्थितीत पडून असून आता ते जीर्ण झाले आहे. अन्न-पाण्यासाठी भटकणाऱ्या शेतकऱ्यांच्या हक्काच्या वास्तूची ही दुरवस्था समितीच्या उदासीनतेची साक्ष देते.

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# व्यवस्थेची अपयशगाथा!


शिक्षण व्यवस्थेचा पाया हा विश्वासावर उभा असतो. विद्यार्थी वर्षानुवर्षे परिश्रम करतो, पालक त्याच्यावर आर्थिक आणि मानसिक गुंतवणूक करतात आणि समाज गुणवत्तेच्या आधारे सक्षम डॉक्टर, अभियंते, शिक्षक किंवा अधिकारी घडण्याची अपेक्षा ठेवतो. मात्र, प्रश्नपत्रिका फुटण्याच्या वारंवार घडणाऱ्या घटनांनी हा विश्वासच डळमळीत केला आहे. राष्ट्रीय पातळीवरील नीट परीक्षेच्या पेपरफुटीचे प्रकरण अजूनही ताजे असतानाच महाराष्ट्रातील शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे परीक्षा ऐनवेळी पुढे ढकलावी लागली. ही केवळ प्रशासकीय चूक नाही, तर शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर झालेला गंभीर आघात आहे. प्रश्नपत्रिका फुटते, परीक्षा रद्द होते, चौकशी समिती नेमली जाते, काही संशयितांना अटक होते आणि काही महिन्यांनी विषय मागे पडतो. हे चक्र इतक्या वेळा घडले आहे की त्यात नवीन काही उरलेले नाही. मात्र, प्रत्येक वेळी हजारो-लाखो प्रामाणिक परीक्षार्थींच्या आयुष्याचा मौल्यवान काळ, मानसिक संतुलन आणि मेहनत याची भरपाई कोण करणार, याचे उत्तर मात्र सरकारकडे नसते.

परीक्षा म्हणजे केवळ प्रश्नपत्रिका सोडविण्याचा कार्यक्रम नसतो. त्यासाठी विद्यार्थी किंवा उमेदवार महिनोनमहिने तयारी करत असतो. त्याच्या मनात विशिष्ट दिवशी परीक्षा देण्याची मानसिक तयारी झालेली असते. त्या अनुषंगाने प्रवास, निवास, सुट्ट्या, कौटुंबिक कार्यक्रम आणि आर्थिक नियोजन केलेले असते. परंतु, पेपरफुटीमुळे अचानक परीक्षा रद्द झाली की हे संपूर्ण नियोजन कोलमडते. सरकारी यंत्रणेसाठी ती फक्त पुढे ढकललेली परीक्षा असते; परंतु परीक्षार्थ्यांसाठी तो मानसिक धक्का असतो. पुन्हा नव्याने अभ्यास करण्याची ऊर्जा, आत्मविश्वास आणि उत्साह प्रत्येकामध्ये तितकाच टिकून राहतो असे नाही. विशेषत: शिक्षक पात्रता परीक्षेचे महत्त्व अधिक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतर शिक्षक होण्यासाठी किंवा अनेक विद्यमान शिक्षकांना सेवेत टिकून राहण्यासाठी ही परीक्षा अनिवार्य झाली आहे. म्हणजेच आधीच बीएड, डीएड किंवा एमएडसारख्या व्यावसायिक पदव्या घेतलेल्या उमेदवारांनाही आणखी एका पात्रता परीक्षेतून जावे लागते. नोकरी सांभाळत अभ्यास करणाऱ्या शिक्षकांवर यामुळे अतिरिक्त ताण येतो. त्यात पेपरफुटीसारख्या घटना घडल्यास त्यांची निराशा अधिकच वाढते.

यातून आणखी एक गंभीर प्रश्न समोर येतो. सरकारने विविध क्षेत्रांसाठी पात्रता परीक्षा सुरू केल्या; परंतु त्या पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह पद्धतीने घेण्याची क्षमता संबंधित यंत्रणांनी विकसित केली आहे का? जर प्रश्नपत्रिकाच सुरक्षित ठेवता येत नसेल, तर अशा परीक्षा घेण्यामागील संपूर्ण उद्देशच संशयास्पद ठरतो. पात्रतेचा दर्जा उंचावण्याच्या नावाखाली भ्रष्टाचार, दलाली आणि पेपरफुटीचे जाळे तयार होत असेल, तर त्या व्यवस्थेचे पुनर्मूल्यांकन अपरिहार्य ठरते. गेल्या काही वर्षांत स्पर्धा परीक्षा आणि पात्रता परीक्षांभोवती कोट्यवधी रुपयांचा उद्योग उभा राहिला आहे. कोचिंग क्लासेस, ऑनलाइन अभ्यासक्रम, टेस्ट सिरीज, मार्गदर्शन केंद्रे आणि विविध एजन्सी यांची मोठी आर्थिक साखळी निर्माण झाली आहे. बहुतांश संस्था प्रामाणिकपणे काम करतात; परंतु काही अपप्रवृत्ती या व्यवस्थेचा गैरफायदा घेत असल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. पेपरफुटी, कॉपी, बनावट उमेदवार आणि दलालांचे जाळे हे त्याच विकृत व्यवस्थेचे परिणाम आहेत. त्यामुळे केवळ गुन्हेगारांना अटक करून प्रश्न सुटणार नाही; तर संपूर्ण परीक्षा व्यवस्थेची सुरक्षा आणि उत्तरदायित्व नव्याने उभारावे लागेल. राज्य सरकारने विशेष चौकशी पथक नेमण्याची घोषणा केली आहे. चौकशी आवश्यक आहेच; पण त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे दोषींना जलद आणि कठोर शिक्षा झाली पाहिजे. पेपरफुटी हा साधा फौजदारी गुन्हा नसून लाखो तरुणांच्या भवितव्याशी केलेला विश्वासघात आहे. त्यामुळे अशा गुन्ह्यांमध्ये आर्थिक दंड, मालमत्ता जप्ती, दीर्घ कारावास आणि संबंधित संस्थांवर कायमस्वरूपी बंदीसारख्या कठोर उपायांची गरज आहे. चौकशीचा गाजावाजा करून काही दिवसांनी प्रकरण विस्मरणात जाणे, हीच आजवरची शोकांतिका राहिली आहे. आजच्या व्यवस्थेतील पेपरफुटी, गैरव्यवहार आणि न्यायालयीन वाद पाहता संपूर्ण प्रणालीचे पुनरावलोकन करण्याची आवश्यकता नाकारता येणार नाही.

# रेन वॉटर हार्वेस्टिंग करणाऱ्या मालमत्ताधारकांच्या करात ५ टक्के सूट

## पावसाचे पाणी संवर्धनासाठी ब्रम्हपुरी नगर पालिकेची अभिनव योजना




ब्रम्हपुरी/का.प्र.

भागातील पाणीटंचाईचे संकट टाळण्यासाठी, भूजल पातळीत वाढ करण्यासाठी तसेच पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी ब्रम्हपुरी नगर परिषदेने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम, १९६५ मधील कलम १२७-ब अन्वये नगर परिषदेने आपल्या विशेष सभेत 'पावसाचे पाणी संवर्धन व पुनर्भरण (Rain Water Harvesting)' ही परिस्थितिकीय दृष्ट्या हितकारक योजना म्हणून घोषित केली असून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या पात्र मालमत्तांधारकांना निव्वळ मालमत्ता करामध्ये प्रतिवर्ष ५ टक्के दराने कमाल १० वर्षांपर्यंत सूट देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला आहे.

आज हवामान बदल, अनियमित पर्जन्यमान आणि वाढती पाण्याची मागणी यामुळे भूजल पातळी सातत्याने घटत आहे. पावसाचे पाणी योग्य पद्धतीने जमिनीत मुरविल्यास विहिरी, बोअरवेल व इतर जलस्त्रोतांची पाणीपातळी वाढण्यास मदत होते. यामुळे भविष्यातील पाणीटंचाई कमी होण्यास हातभार लागेल. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरामध्ये, इमारतीमध्ये, व्यावसायिक प्रतिष्ठानामध्ये तसेच संस्थांमध्ये पावसाचे पाणी संवर्धन व्यवस्था उभारल्यास संपूर्ण शहराच्या जलसुरक्षेला मोठे बळ मिळू शकते.

याप्रसंगी नगराध्यक्ष श्री योगेश मिसार यांनी नागरिकांना आवाहन केले की, 'पाणी हा निसर्गाने दिलेला अमूल्य ठेवा आहे. आज आपण पावसाचा प्रत्येक थेंब जपला तरच उद्याला आपणास पाण्याची सुरक्षितता राहील. ब्रम्हपुरी शहरातील प्रत्येक घर, संस्था, व्यावसायिक आस्थापना आणि उद्योगांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली उभारून जलसंवर्धनाच्या या लोकचळवळीत सहभागी व्हावे. पर्यावरण संरक्षणासाठी योगदान देणाऱ्या नागरिकांचा सन्मान म्हणून नगर परिषद मालमत्ता करामध्ये सूट देत आहे. ही सूट आर्थिक लाभापेक्षा सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारी एक छोटीशी प्रेरणा आहे. प्रत्येक नागरिकाने या संधीचा लाभ घेत शहराच्या जलसंपत्तीचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घ्यावा.'

मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे यांनी सांगितले की, 'ब्रम्हपुरी नगर परिषद शहरातील प्रत्येक नागरिकाने आपल्या मालमत्तेमध्ये पावसाचे पाणी संवर्धन व पुनर्भरण व्यवस्था उभारावी, अशी अपेक्षा आहे. या योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मालमत्ता करामध्ये सूट देण्यात येणार असून नागरिकांनी या योजनेचा लाभ घेत जलसंवर्धनासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा. जलसंधारण ही केवळ शासनाची नव्हे तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.'

ब्रम्हपुरी नगर परिषद सर्व नागरिकांना या योजनेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करीत असून, 'पावसाचा प्रत्येक थेंब जपूया... भूजल समृद्ध करूया... भविष्यातील पाणीटंचाई टाळूया.' या संदेशासह जलसंवर्धनाची व्यापक लोकचळवळ उभी करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला येथे दि.२६जून २०२६ ला छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती साजरी करण्यात आली. या वेळेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन दुधे यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला फुले व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

या वेळेस राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन, प्रा.डॉ.अनुप बारसागडे, प्रा.डॉ. सुहास साकरकर, प्रा. पृथ्वीराज मेश्राम, प्रा. छगन डोईजड, प्रा.भूपेश भेंडारकर, प्रा. खुशबू कापगते, प्रा. पायल नागोसे, प्रा. चेतन चौधरी,प्रा. सविता वसाके, प्रा. पूजा घुटके, प्रा. रेशमा मातेरे, प्रा. प्राची मांडवे, प्रा. दिशा मूल, प्रा. विजया सोनवणे, प्रा. अमिषा जयस्वाल, प्रा. प्रसेनजीत लांडगे, प्रा. राकेश तरारे, प्रा. देवाशीष भरणे, भूपेश गोस्वामी, महेश मेश्राम, सुधीर बडदे, आशिष गजपुरे, सकलेन पठाण आदी कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## विनोदिनी

गुरूजी : बंडया... लक्ष कुठे आहे... आता सांग.. पटापट ऊसापासून काय तयार होते....

बंडया : ऊसापासून.... साखर तयार होते.

गुरूजीः- शाबास... बंडया... पुढे सांग.. आणखी काय काय तयार होते...

बंडयाः साखरेपासून.. तयार होतो... साखरपूडा.. साखरपुडयानंतर.... लग्न होते.. लग्ना नंतर... काय होते... सांगू... का.. गुरूजी??

गुरूजीः- गाढवा... पुढे बोलशील तर... मार खाशील

बंडयाः- (पळत) ..लग्नानंतर ..भांडण होतात...!!!

# प्रलंबित वाढीव मोबदला व कालव्याच्या दुरूस्तीस प्रशासनाला ८ दिवसांचा अल्टिमेटम

## बाधित शेतकऱ्यांच्या हिताकरिता कम्युनिस्ट पक्षाचे विनोद झोडगे यांचा आक्रमक पवित्रा

ब्रम्हपुरी/का.प्र.

गोसेखुर्द प्रकल्पासाठी जमिनी देऊनही हक्काच्या मोबदल्यासाठी वणवण भटकणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आता ठिणगी पडली आहे. 'शेतकऱ्यांचा प्रलंबित मोबदला त्वरित द्या आणि कालव्यांच्या दुरुस्तीतील प्रशासकीय दिरंगाई थांबवा, अन्यथा आपल्या कार्यालय समोर येणाऱ्या हप्ताभरात विशाल धरणे व घेरा डालो तीव्र आंदोलन छेडले जाईल,' असा इशारा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. विनोद झोडगे पाटील यांनी दिला आहे. सोमवार, २९ जून रोजी सायघाटा येथील गोसेखुर्द उजवा कालवा विभाग कार्यालयावर धडक देऊन मा. शेख, कार्यकारी अभियंता यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी कॉ. झोडगे पाटील यांनी प्रशासनाच्या अनास्थेवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. १९८४ पासून सुरू असलेल्या या प्रकल्पात शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल दराने घेण्यात आल्या. आता 'वाढीव मोबदला' देण्याचे आमिष दाखवून शेतकऱ्यांकडून कागदपत्रे गोळा केली जात आहेत. या प्रक्रियेत प्रत्येक शेतकऱ्याचे १५ ते २० हजार रुपये खर्च झाले असून, ३०० रुपयांच्या नोटरीसाठी वकिलांमार्फत ३००० रुपये उकळले जात असल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला. 'हा आर्थिक भ्रष्टाचार कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे?' असा संतप्त सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

हळदा B-4 कालव्याची पाळ अद्याप दुरुस्त झालेली नाही. कालव्यांमध्ये गाळ आणि झाडे-झुडपे वाढल्याने टेलच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचणे कठीण झाले आहे. पावसाळा सुरू झाला असतानाही साफसफाईची कामे न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

बाधित शेतकऱ्यांचा थकीत व वाढीव मोबदला ८ दिवसांत थेट बँक खात्यात जमा करावा, नोटरीच्या नावाखाली होणारी शेतकऱ्यांची लूट थांबवून पारदर्शक प्रक्रिया राबवावी, पावसाळ्यापूर्वी कालव्यांची दुरुस्ती आणि गाळ काढण्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, बाधित शेतकऱ्यां सोबत नागपूर येथील सिंचन कार्यालयात मुख्य कार्यकारी अभियंता सोबत तातडीने बैठक घ्यावी, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

प्रशासनाने मागील २९ मे २०२६ रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे पदाधिकारी आणि शेतकऱ्यांची गोसेखुर्द उजवा कालवा विभाग सायगाटा येथे बैठक घेऊन २५ दिवसाच्या आत वाढीव मोबदला रक्कम देण्याचे तत्कालीन कार्यकारी अभियंता मा. हासे यांनी मान्य केले होते. आता त्यांची बदली होऊन २० दिवस झाले तर दिलेल्या आश्वासनाला १ महिना झाला तरी वाढीव मोबदला रक्कम अजूनही शेतकऱ्यांना मिळाली नाही त्यामुळे शेतकऱ्यां मध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे म्हणून शेतकरी प्रतिनिधी म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड विनोद झोडगे पाटील यांनी दिनांक २९ जून रोजी सायघाटा येथील गोसेखुर्द उजवा कालवा कार्यालय येथे नव्याने रुजू झालेले कार्यकारी अभियंता मा. शेख यांना निवेदन देऊन चर्चा केली व येणाऱ्या वाढीव मोबदला रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात हप्ताभरात जमा झाली नाही तर आपल्या कार्यालयाला समोर विशाल धरणे व 'घेरा डालो' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आला आहे.

# समाजसेवी संघटनातर्फे व्याघ्रपिडीत कुटूंबांना मदत

## व्याघ्रपिडीत कुटूंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्याची मागणी




ब्रम्हपुरी/का.प्र.

२२ मे हा दिवस चंद्रपुर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही गावावर दुःखाचा डोंगर कोसळवणारा ठरला. वनक्षेत्रात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या माळी समाजातील चार महिलांचा वाघाच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेच्या अवघ्या महिनाभरापूर्वी याच गावातील वच्छला वाटगुरे या महिलेचाही वाघाच्या हल्ल्यात बळी गेला होता. वर्षभरात घडलेल्या या सलग आणि दुर्दैवी मृत्यूच्या घटनांमुळे गुंजेवाही परिसरासह संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात भीती व शोककळा पसरली असून या घटनांनी संपूर्ण महाराष्ट्रालाही हादरवून सोडले आहे.

गुंजेवाही येथे वाघाच्या भीषण हल्ल्यात कवलाबाई मोहुर्ले, अनिता मोहुर्ले, सुनीता मोहुर्ले आणि संगीता चौधरी या चार महिलांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

मन हेलावून टाकणाऱ्या या घटनेची दखल महात्मा फुले मित्र मंडळ, ब्रम्हपुरी, अ.भा.माळी महासंघ,चंद्रपूर जिल्हा, माळी महासंघ,चंद्रपूर जिल्हा आणि समता परिषद,चंद्रपूर यांनी घेतली व सर्वांच्या वतीने व्याघ्रपिडित कुटुंबाला यथाशक्ती आर्थिक मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आणि डॉ. एन. एस. कोकोडे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वनमंत्री, ग्रामविकास राज्यमंत्री जयकुमार गोरे, जिल्याचे पालकमंत्री, मानवाधिकार आयोग, चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व आमदार, वनसंरक्षक चंद्रपूर व ब्रम्हपुरी विभाग यांना निवेदन दिले. या माध्यमातून शासनाकडे आर्थिक निधी, व्याघ्रपिडित कुटुंबातील एकाला कायमस्वरूपी शासकीय नोकरी, वनाधारित उत्पादन प्रकल्प उभे करून ग्रामीण लोकसंख्येला बारमाही रोजगार उपलब्ध करून द्यावा इ. मागण्या करण्यात आल्या.

सर्व समाजसेवी संघटनांनी केलेल्या मदतीच्या आवाहनाला समाजाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला व कमी कालावधीत सुमारे दिड लाखाहून अधिक मदतनिधी जमा झाली. ही मदतनिधी वरील सर्व समाजसेवी संघटना, सिनियर सिटीझन कोसरे माळी असोसिएशन,नागपूर, माळी समाज संघटना सिंदेवाही, अ भा माळी महासंघ मुलं व महाराष्ट्रातील विविध भागातून प्राप्त झाली. या मदतनिधीचे वितरण व्याघ्रपिडित पाचही कुटुंबांना समप्रमाणात करण्यात आले. यासाठी आयोजित मदतनिधी सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. एन. एस. कोकोडे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. नामदेवराव जेंगठे, प्रा. धनंजय वाढई, प्रा.नकटू सोनुले, प्रा. अरुण शेंडे, वंदनाताई शेंडे, अशोक शेंडे, सुभाष शेंडे उपस्थित होते. याप्रसंगी विचारमंचावर विजय मोहुर्ले, डॉ. भास्कर लेनगुरे, डॉ. राजू आदे, डॉ.राहुल मोहुर्ले, डॉ. पंकज बेंदेवार, दिलीप लोनबले, कावळे, गंगाधर गुरनुले उपस्थित होते.

**जल है तो कल है...**

# मुख्य मार्गावर गतिरोधक बसवा

## ब्रम्हपुरी भाजपा युवा मोर्चाची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरातील देलणवाडी वॉर्डपासून इंदिरा गांधी चौक ते रेल्वे फाटक या राष्ट्रीय महामार्गावरील वर्दळीच्या मार्गावर वारंवार अपघात होत असल्याने या मार्गावर तातडीने गतिरोधक बसविण्याची मागणी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा, ब्रम्हपुरी शहराच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात ब्रम्हपुरीचे तहसीलदार सतिश मासाळ यांना निवेदन सादर करण्यात आले.



सदर मार्गावर काही दिवसांपूर्वी दोन गंभीर अपघात घडले असून, अपघातांची मालिका सुरूच राहण्याची भीती नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ब्रम्हपुरी शहर हे ग्रामीण भागासाठी मध्यवर्ती ठिकाण असून, या मार्गावरून दररोज हजारो नागरिक, विद्यार्थी तसेच दुचाकी, चारचाकी व जड वाहने मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. वाहनांचा वाढता वेग आणि वर्दळ यामुळे अपघातांची शक्यता अधिक वाढली आहे. त्यामुळे या मार्गावर आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक बसवून वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणावे व अपघातांना आळा घालावा, अशी मागणी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आली.

याावेळी भाजपा शहराध्यक्ष प्रा. डॉ. सुयोगकुमार बाळबुध्दे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष तनय देशकर, युवा मोर्चा शहराध्यक्ष अमित रोकडे, माजी नगरसेवक मनोज वठे, स्वप्नील अलगदेवे, बंटी येरावर, निखिल प्रधान, केतन पेशने, राहुल शुभेदार, कृष्णा मेहेर, दीपक कावळे, मोहित कावळे, आदित्य लोखंडे तसेच अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# किडनी तस्करी प्रकरणात ब्रम्हपुरीतील पुन्हा एक सावकार अडकला

## दिवाकर निकुरेवर गुन्हा दाखल, जमिन खरेदी-विक्रीतील प्रकरणेही समोर येणार

ब्रम्हपुरी/का.प्र.


मागील काही महिन्यापासून राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या किडनी तस्करी प्रकरणात आतापर्यंत सहा अवैध सावकारांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. दरम्यान, पीडित शेतकरी रोशन कुडे याच्यासोबत ८ लाखांचे व्यवहार केल्याप्रकरणी एसआयटीने ब्रह्मपुरीतील दिवाकर निकुरे या अवैध सावकारावर गुन्हा दाखल केला. मात्र, निकुरेला अटकपूर्व जामीन मिळाला असल्याने अटकेपासून संरक्षण मिळाले असले तरी जमीन खरेदी-विक्रीतून फसवणूक केल्याची अनेक प्रकरणे समोर येण्याची शक्यता आहे.

मिंधूर येथील पीडित रोशन कुडे यांच्या तक्रारीनंतर उजेडात आलेल्या किडनी तस्करी प्रकरणाचा तपास एसआयटीच्या माध्यमातून जवळपास ११ राज्यात करण्यात आला. यादरम्यान अनेक 'रिसीवार आणि डोनर'चे बयाण नोंदविण्यात आले होते. दरम्यान, ब्रह्मपुरीतील सहा अवैध सावकारांनी कुडे यांची फसगत केल्याचे समोर आल्यानंतर त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. मात्र, काही दिवसांपूर्वी बिल्डर दिवाकर निकुरे याच्याविरोधातही एसआयटीकडे तक्रार केली होती. या तक्रारीवरून एसआयटीच्या पथकाने सखोल चौकशी केली असता, ८ लाखांचे व्यवहार करुन फसगत केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर निकुरेवर ब्रह्मपुरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकरणात ब्रम्हपुरीतील अवैध सावकारांनी अवाढव्य व्याज लावून कुडे यांच्याकडे पैशासाठी तगादा लावला होता. एक लाखांच्या रकमेचे जवळपास ७४ लाख रुपये वसूल करण्यासाठी बळजबरी केली जात होती. त्यामुळे पीडित शेतकऱ्याला शेतीही विकावी लागली. दरम्यान, हा अवैध सावकारीचा गोरखधंदा उजेडात आल्यानंतर सहा अवैध सावकारावर गुन्हे दाखल करण्यात आले होते. मात्र, बिल्डर दिवाकर निकुरे यानेही कुडे यांची फसगत केल्याचे तपासात निष्पन्न झाल्यानंतर त्याच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, या प्रकरणाची भनक आधीच लागल्याने निकुरेने अटकपूर्व जामीन मिळविला असून, अटकेपासून संरक्षण मिळाले आहे. मात्र, या प्रकरणातून निकुरेचे अनेक कारनामे समोर येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### प्लॉट विक्रीच्या फसवणुकीचेही बिंग फुटणार

**ब्रह्मपुरीतील बिल्डर दिवाकर निकुरे याच्याकडून चंद्रपूर व नागपूर जिल्ह्यात जमीन खरेदी-विक्री केली जात असून, यापूर्वी प्लॉट विक्रीच्या व्यवसायात अनेकांची फसगत केल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत. काही प्रकरणे न्यायालयात गेली असून, अनेकांची या व्यवसायातून फसवणूक करण्यात फसवणूक करण्यात आली आहे. दरम्यान, अवैध सावकारीच्या प्रकरणात गुन्हे दाखल झाल्याने प्लॉट खरेदी-विक्रीतून फसवणूक केल्याच्या प्रकरणांचेही बिंग फुटण्याची शक्यता आहे.**

# ब्रम्हपुरीत अनेकांचा काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश



ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या विचारधारेवर तसेच विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत ब्रम्हपुरी येथील अनेक युवक व सामाजिक कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांनी नवप्रवेशित युवकांचे काँग्रेस पक्षाचा दुपट्टा घालून स्वागत केले. युवकांनी पक्षाच्या जनहिताच्या धोरणांवर, संविधान संरक्षणाच्या भूमिकेवर आणि सर्वसमावेशक विकासाच्या विचारांवर विश्वास व्यक्त करत काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

काँग्रेस पक्षात प्रवेश करणाऱ्यांमध्ये सुरज मेश्राम, विश्रांत अंबादे, रजत मेश्राम, अतुल बोदिले, अक्षय धोंगडे, राहुल मेश्राम, अमित बावणे, सुरज बोदले, अंकुश चहांदे, कालिदास बोदले, हिवराज नंदेश्वर, विकास डांगे, अशोक बोदले, धनपाल बोरकर, नरेंद्र शेंडे, मंगेश टेंभुर्णे, अश्वघोष अंबादे, बादल लोखंडे, अपूर्व भैसारे, गौतम अंबादे, चेतन फुलझेले, अनुज सांगोले, पीयूष भोवते, नीलेश कुर्वे, बालू रामटेक, अनुप भैसारे, युवराज वासनिक, सोनू कांबळे, स्वप्नील खोब्रागडे, रवी वंजारी आदींचा समावेश आहे.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुरज मेश्राम यांच्यासह अनेक युवकांनी काँग्रेस पक्षाच्या विचारसरणीशी जोडले जात संघटन मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. युवकांचा काँग्रेस पक्षाकडे वाढता विश्वास हा पक्षाच्या लोकाभिमुख धोरणांचा व नेतृत्वावरील विश्वासाचा परिणाम असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

नव्याने सहभागी झालेल्या युवकांमुळे ब्रम्हपुरी तालुक्यात काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत होणार असून समाजहिताच्या कार्याला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी तालुका व शहर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजप कार्यालय परिसरात वृक्षारोपण

## महिला मोर्चा शहरअध्यक्ष वर्षा चौधरी यांचे वाढदिवसाचे औचित्य

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहराच्या भाजपा महिला मोर्चाच्या शहरअध्यक्ष वर्षा चौधरी यांच्या वाढदिवसानिमित्त माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयाच्या पटांगणात वृक्षारोपण करण्यात आले.




याप्रसंगी वर्षा चौधरी यांनी मनोगत व्यक्त करतांना वाढदिवस म्हणजे केवळ केक कापून आनंद साजरा करणे नव्हे, तर आपल्या आयुष्यात एक नवीन वर्षाची सकारात्मक सुरूवात करणे होय. आजच्या आधुनिक युगात आपण प्रगती करीत आहोत पण त्याच सोबत आपण पर्यावरणाचा समतोल ढासळतानाही पाहत आहोत. वाढते प्रदूषण, ग्लोबल वॉर्मिंग आणि घटत्या झाडांमुळे मानवाचे आरोग्य धोक्यात आले आहे. निसर्गाचे रक्षण करणे ही केवळ सरकारचीच नाही, तर आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. म्हणून मी वाढदिवसाचा खर्च न करता वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला आहे.

यावेळी महिला मोर्चाच्या चेतना येवले, सूर्यकांता गेडाम, वर्षा जोशी, वर्षाताई सहारे ललिता कामडी, सारिता गायकवाड, प्रतिभा भोयर, नगरसेवक मनोज भूपाल, प्रा. संजय लांबे, प्रा. अशोक सालोटकर, प्रा. दिलीप जुमडे, घनश्याम कावळे, राजु भागवत, राजु चौधरी, सुरेश बनपुरकर, पुरुषोत्तम सडमाके उपस्थित होते.

# रक्तदाब आणि त्याविषयी जागरूकता या विषयावर कार्यशाळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि.२७.६.२०२६ रोजी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला महाविद्यालयात 'हायपरटेंशन अवेअरनेस' या विषयांवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ब्रम्हपुरीचे सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. भरत गणवीर यांनी रक्त दाब आणि घ्यावयाची काळजी या विषयांवर सुंदर असे मार्गदर्शन केले. वरील कार्यशाळा ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेड मुंबई यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आले होते.

या वेळेस सेल्स मॅनेजर वेदांत कोटांगले तसेच अभिषेक उमरे, समीप उईके व प्रसाद खेमसकर हे कंपनीच्या वतीने उपस्थित होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन दुधे, प्राचार्य डॉ. व्यंकटेश कॅवर्स, विभाग प्रमुख डॉ. विशाल लोखंडे तसेच डॉ. सुहास साकरकर हे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमास सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. पायल इंदुरकर यांनी केले. संचालन एन.एस.एस.अधिकारी प्रा. श्रीकांत महाजन यांनी केले आणि आभार प्रदर्शन प्रा.अनिकेत नखाते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे अध्यक्ष देवेन्द्रजी पिसे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# आणीबाणीच्या काळया दिवसांची आठवण व लोकतंत्र सेनानींचा सत्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

"१९७५ मधिल आणीबाणीचा काळ हा भारतीय लोकशाही समोरील सर्वात मोठ्या आव्हानापैकी एक होता. या काळात नागरिकांचे बहुतांश मुलभूत हक्क स्थगित करण्यात आले. २५जुन १९७५ रोजी देशात आणीबाणीची घोषणा करण्यात आली होती. या घटनेला ५१वर्ष पूर्ण होत आहे. आणीबाणीच्या काळात वृत्तपत्रावर बंधने लादली गेली. विरोधी पक्षांच्या नेत्यांना अटक झाली आणि नागरिकांच्या स्वातंत्र्यानंतर गदा आणली. भारतातील संपूर्ण जेल तुडुंब भरल्या गेली. अनेक लोकतंत्र सेनानींना मीसाबंदी या कायद्याअंतर्गत १९ महीने जेल



बंदी केल्या गेली. या कालावधीत अनेक लोकतंत्र सेनानी चे कुटुंब अस्ताव्यस्त झाली. १३१ मीसाबदींचा या दरम्यान जेलमध्ये मृत्यू झाला. आणीबाणीच्या काळात देशाच्या आणि संविधानाच्या रक्षणार्थ लोकतंत्र सेनानींनी लाठ्या-काठ्या खाल्या, जेलमध्ये जाऊन अनेक यातना सहन केल्या कारण या देशाची लोकशाही जिवंत ठेवणे आणि संविधानाचे रक्षण करणे हाच त्यांचा डीएनए होता," अशा आणीबाणीच्या काळ्या दिवसाच्या आठवणी प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून रविंद्रजी भुसारी, माजी प्रदेश संघटनमंत्री भाजपा यांनी लोकमान्य टिळक वाचनालय येथे प्रतिपादन केले.

याप्रसंगी लोकतंत्र सेनानी मीसाबंदी व सत्याग्रही यांचा सन्मान करण्यात आला. त्यात वामनराव भुसारी, यशवंतराव नानोटी, दिलीपराव शिनखेडे, स्व. भास्करराव भुसारी यांचे चिरंजीव ॲड. वसंतराव भुसारी, स्व. पांडुरंगपंत जोशी यांचे चिरंजीव श्रीपादराव जोशी, स्व. बाबुराव लांबे यांचे चिरंजीव प्रा. संजय लांबे, स्व. नामदेवराव सालोटकर यांचे चिरंजीव प्रा. डॉ. अशोक सालोटकर, स्व.वामनराव लांबे यांचे चिरंजीव मुकुंदराव लांबे, स्व. संभाजी दलाल यांचे लहान बंधू प्रकाश दलाल, रविंद्रजी भुसारी या सर्वांचा शाल व पुष्प देउन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्ननील अलगदिवे यांनी, प्रास्ताविक व परिचय शहर अध्यक्ष प्रा.डॉ. सुयोग बाळबुध्दे यांनी तर आभार प्रदर्शन साकेतजी भानारकर यांनी केले. भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात महिला तक्रार निवारण समितीची सभा संपन्न

## शासकीय आदेशानुसार समिती गठीत



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात शासनाच्या आदेशानुसार महिला तक्रार निवारण समिती संदर्भात महिला तक्रार निवारण समितीची सभा प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

शासन निर्णयानुसार समिती गठित करुन महिला कर्मचारींना निर्भयपणे वातावरण निर्माण करण्यासाठी शासनाचे आदेश धोरण पालन करणे, समितीत पन्नास टक्के पुरुष कर्मचारी समावेश करणे, समितीचे फलक लावणे, आनंददायी पोषक वातावरणात निर्माण करणे इत्यादी बाबींवर चर्चा करण्यात आली.

समितीमध्ये डॉ रेखा मेश्राम अध्यक्ष तर डॉ धनराज खानोरकर, डॉ कुलजित शर्मा, डॉ दर्शना उराडे, प्रा निलिमा रंगारी, प्रा धिरज आतला, अधीक्षक संगीता ठाकरे, प्रा अजय खोब्रागडे, प्रा ओजस्विनी बावनकुळे, सुषमा राऊत व माजी नगरसेविका अर्चना खंडाते इत्यादी सदस्य म्हणून निवड करण्यात आली. संचालन डॉ रेखा मेश्राम तर आभार प्रदर्शन डॉ धनराज खानोरकरांनी केले.

... QUOTES ...

"The worst times can be the best if you with positive energy."

- Dominico Dolce

चारोळी

पोरावर 100 टक्के करतेस प्रेम
सुनेचा मात्र दु:स्वास करतेस...
चांगली आई असून सुध्दा,
सासु म्हणून एटीकेटी ठरतेस...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# झिलबोडी येथे वट वृक्षाचा विवाह सोहळा



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील झिलबोडी मध्ये वटवृक्ष-वधु बाहुली विवाह सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न झाले. महिला भगिनींनी वाजतगाजत लावला वडाचा विवाह आणि वटसावित्रीची परंपरा जपत वटवृक्ष विवाह, पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला व जिथे संस्कृती निसर्गाशी जोडली जाते.

झिलबोडी गावात वटवृक्षाचा विवाह सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. वडराजाला हळद लावली, हार घातले, महिलांनी सप्तपदी घातली. हे लग्न फक्त झाडाचं नाही, तर पर्यावरण वाचवण्याच्या वचनाचं आहे. पुढच्या ३०० वर्षांसाठी ऑक्सिजनचं गिफ्ट आहे. हिंदू धर्मात वडाच्या झाडाला अत्यंत पवित्र मानले जाते. अशी मान्यता आहे की या वृक्षात ब्रह्मा, विष्णू आणि महेश (शिव) या तिन्ही देवांचा वास असतो. वटपौर्णिमेच्या दिवशी महिला आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी या झाडाची पूजा करतात आणि प्रदक्षिणा घालतात. पाच प्रकारच्या पानाचे मांडव तयार करून विवाह धार्मिक गाणी म्हणत मंत्रमुग्ध झाले. वटवृक्षाचे लग्न लावून माणुसकीचा धर्म हा संदेश देण्यात आले. यावेळी गावातील बहुसंख्य पुरूष व महिला उपस्थित होते.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता

www.bramhapuri samachar.com/bs

या ऑनलाईन साईटला भेट द्या

बातम्यांकरीता संपर्क :

मो. 9503100964
मो. 8275715315

Lubi PUMPS·MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404

N.B.H. Education Society's

# NEVJABAI HITKARINI COLLEGE

BRAMHAPURI, DISTT. CHANDRAPUR (Ph.No. 272033 & 273293) (M.S.)

(Estd. 1962 & NAAC Re-accredited "B++" Grade (CGPA 2.87)

## Wanted Clock Hour Basis (CHB) Teachers

### (For UG Level Grant Basis for Session 2026-2027)

**Walk-in-Interview**

As per permission of Hon. J D Letter No. उशिनाग/पदमा/सीएचबी/ना.ह.प्र./ई-3280061 दि. २४/०६/२०२६& vide Permission of Gondwana University letter no. गो.वि./म.वि.वि.वि.वि./५७५/२०२६ दि. ११/०६/२०२६.The qualification and teaching remuneration shall be as per the terms and conditions laid down in GR Govt. of Maharashtra No. अर्थसं-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/माशि-३, दिनांक २७ मार्च २०२३.

| Sr. No. | Subject | No.of Posts | Date of Interview |
|---|---|---|---|
| 1 | Electronics | 02 | Dt. 08/07/2026 at 11.00 am |
| 2 | Physics | 02 | |
| 3 | Maths | 01 | |
| 4 | Botany | 02 | |
| 5 | Zoology | 02 | |
| 6 | Home Economics | 02 | |

**Wanted Clock Hour Basis (CHB) Teachers (For Non-Granted courses) (On UG and PG Level)**

| Subject | No.of Posts PG | No.of Posts UG | Date of Interview | Subject | No.of Posts PG | No.of Posts UG | Date of Interview |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Physics | 8 | - | Dt. 08/07/2026 at 11.00 am | Marathi | 6 | 2 | Dt. 09/07/2026 at 11.00 am |
| Mathematics | 8 | 4 | | English | 6 | - | |
| Chemistry | 8 | 2 | | Home-Economics | 6 | 5 | |
| Zoology | 8 | 2 | | Geography | 6 | 5 | |
| Botany | 8 | 2 | | Pol.Science | 6 | 5 | |
| Computer Science | 8 | 8 | | Economics | 6 | 5 | |
| Micro-biology | - | 8 | | History | 6 | 5 | |
| Commerce (Eng.) | 6 | 6 | | Sociology | 6 | 5 | |
| | | | | Library Science | 7 | - | |

**Walk-in-Interview for Contributory Lecturers**

(For Non-Granted courses on Junior College Level)

Session 2026-27


| S.N. | Subject | No.of Posts | Date of Interview |
|---|---|---|---|
| 1 | Commerce (Eng. Medium) Economics | 1 | 09/07/2026 |

**MCVC (Grant-in-aid courses) Date of Interview 09/07/2026 at 11.00 am**

| Sr. No. | Course/Subject | Posts | No.of Posts | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1 | Construction Technology | Teacher/Practical Teacher | 2 | Degree/Diploma in civil Engineer |
| 2 | Marketing and Retail Management | Teacher/Practical Teacher | 2 | M.Com Marketing, II Division |
| 3 | Fisheries Technology | Teacher/Practical Teacher | 2 | M.Sc. Fishery Science/ M.Sc. Zoology (Spl.Fishery) |
| 4 | English | Teacher | 1 | M.A. English & B.Ed. (II Divi.) |
| 5 | Marathi | Teacher | 1 | M.A. English & B.Ed. (II Divi.) |
| 6 | General Foundation Course (पायाभूत अभ्यासक्रम) | Teacher | 1 | M.Com. II Divi. |

Attend the Personal Interview at your own cost along with original and two sets of Xerox copies of Marklists and Certificates **on said date at 11:00 a.m.** in the office of the **Principal, N.H. College, Bramhapuri, Dist.-Chandrapur.**

**Smt. Snehalatabai K. Bhaiya** — President
**Shri. Ashok K. Bhaiya** — Secretary
**Dr. S.M. Shekokar** — Off. Principal



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स


गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.


## ब्रम्हपुरी जिल्हा निर्मितीसाठी संघर्ष...

(पान क्र. १ वरून)

कार्यालय (RTO) आणि एम.आय.डी.सी. (MIDC) कार्यालय तातडीने मंजूर व्हावे, अशी आग्रही मागणी समितीच्या वतीने करण्यात आली.

सध्या मुंबई येथे विधिमंडळाचे अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनात आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरी जिल्हा प्रस्तावाची सद्यास्थिती, चिमूर जिल्हा निर्मितीला असलेला विरोध आणि मेंडकी, मुडझा, तळोधी (बा.) व नवरगाव या मोठ्या गावांना तालुक्याचा दर्जा देण्याबाबत शासनाचे काय नियोजन आहे? यावर सभागृहात 'तारांकित प्रश्न' उपस्थित करून शासनाला जाब विचारावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. आमदार महोदयांनी संपूर्ण विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन ब्रह्मपुरीच्या हक्काचा आवाज विधिमंडळात बुलंद करणार असल्याचे सांगितले.

या निवेदनावर व शिष्टमंडळात प्रामुख्याने संघर्ष समितीचे मुख्य निमंत्रक विनोद झोडगे पाटील प्रमुख निमंत्रक, प्राचार्य सुयोग बाळबुधे, अविनाश राऊत नगरसेवक, हरिचंद्रजी चोले, प्रा. देविदासजी जगनाडे, योगेश मिसार नगराध्यक्ष, नितीन उराडे नगरपरिषदेचे उपाध्यक्ष, प्रकाश खोब्रागडे नगरसेवक, पुष्पांकर बांगरे नगरसेवक, हितेंद्र राऊत, खेमराज तिडके, राजू भागवत, डॉ. बाळक्रिष्ण शेळके, दिलीप जुमडे, रक्षित रामटेके, आकाश खांडेकर, प्रशांत घुटके, भगवान कन्नाके, लीलाधर झलके, घनश्याम कावळे, प्रभाकर नाकतोडे, एम. गाजी पटेल, इंजि. राहुल मैद, अमोल मोटघरे, गणेश बगमारे यांच्यासह ब्रह्मपुरी जिल्हा निर्माण संघर्ष समितीचे पदाधिकारी व जागरूक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ब्रम्हपुरी बाजार समितीचे...

(पान क्र. १ वरून)

सर्व प्रकारचे बाजार एकाच विस्तीर्ण प्रांगणात एकवटल्यामुळे ही बाजार समिती ब्रम्हपुरी तालुक्याची 'शान' बनण्याची मोठी संधी होती. मात्र, प्रशासकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि ढासाळलेल्या व्यवस्थापनामुळे हे मैदान केवळ एक डम्पिंग ग्राउंड बनले आहे. यावर तातडीने उपाययोजना करून बाजार समितीला नवसंजीवनी देण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

नियमित वाचा
अर्धसाप्ताहिक
ब्रम्हपुरी समाचार